मुख्याधिकारी गट-ब संवर्गातील <u>अधिकाऱ्यांच्या बदल्या...</u>
श्री. एच. डी. टाकरखेडे, मुख्याधिकारी आर्वी नगरपरिषद, जि. वर्धा.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः एमसीओ २०१६/प्र.क्र. ०२/नवि १४
मंत्रालय, ४ था मजला (मुख्य इमारत)
हुतात्मा राजगुरू चौक, मादम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ जानेवारी, २०१६

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४(४) (दोन) व ४(५) मधील तरतुदीनुसार श्री. एच. डी. टाकरखेडे, मुख्याधिकारी आर्वी नगरपरिषद, जि. वर्धा यांची मुख्याधिकारी धामणगाव रेल्वे नगरपरिषद, जि. अमरावती या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत आहे.

०२. श्री. टाकरखेडे, मुख्याधिकारी यांच्या धामणगाव रेल्वे नगरपरिषद येथील बदलीमुळे तेथे कार्यरत असणारे श्री. श्रीकृष्ण वाहुरवाघ, मुख्याधिकारी हे नियुक्तीच्या प्रतिक्षेत राहतील.

०३. जिल्हाधिकारी, वर्धा यांनी श्री. एच. डी. टाकरखेडे, मुख्याधिकारी यांना नगरपरिषद धामणगाव रेल्वे, जि. अमरावती येथे रुजू होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, श्री. टाकरखेडे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या मुख्याधिकारी पदाचा अतिरीक्त कार्यभार जवळपासच्या नगरपरिषद मुख्याधिकाऱ्याकडे किंवा महसूल अधिकाऱ्याकडे सोपवावा.

०४. जिल्हाधिकारी अमरावती यांनी श्री. एच. डी. टाकरखेडे, मुख्याधिकारी यांना धामणगावरेल्वे नगरपरिषद येथे रुजू करुन घ्यावे.

०५. तसेच या आदेशान्वये करण्यात आलेल्या बदल्या रद्द करणे किंवा त्यात बदल करणे या साठी राजकीय दडपण/ दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात येईल.

०६. श्री. टाकरखेडे, मुख्याधिकारी यांनी नियुक्तीच्या नविन ठिकाणी तात्काळ रुजू होऊन तसा अनुपालन अहवाल शासन सादर करावा.

०७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१६२३२२५२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.07 15:01:25 +05'30'

(ज. ना. पाटील)
शासनाचे उपसचिव

प्रती,

१. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, अमरावती/नागपूर विभाग
३. जिल्हाधिकारी, वर्धा/ अमरावती
४. नगराध्यक्ष, नगपरिषद आर्वी, जि. वर्धा
५. नगराध्यक्ष, नगपरिषद धामणगावरेल्वे, जि. अमरावती
६. श्री. एच. डी. टाकरखेडे, मुख्याधिकारी आर्वी नगरपरिषद, जि. वर्धा
७. श्री. श्रीकृष्ण वाहुरवाघ, मुख्याधिकारी धामणगाव रेल्वे नगरपरिषद, जि. अमरावती

प्रतीलिपि,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ०३२.
२. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ०३२.
३. सचिव (नवि-२) यांचे विशेष कार्य अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ०३२.
४. उपसचिव (नवि-१८), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ०३२.
५. कार्यासन अधिकारी/नवि १८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ०३२.
६. निवड नस्ती/नवि १४.